महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३६१९ (वै.)२६४७४७५३ फॅक्स : ०२२.२६४७२३६६

---

**पीआर-३/जनरल/** 32652 **दिनांक :** 09-10-2009

## परिपत्रक क्र. १०८

**विषय :- महानगरपालिका / नगरपालिका यांनी महावितरण कंपनीच्या विजेची देयके व थकबाकी भरण्यासंबंधी ---**

संदर्भ :- १) नगर विकास विभाग परिपत्रक क्र. संकीर्ण २००९/७९१/प्र.क्र.१२५/नवि-२० मंत्रालय, मुंबई ३२ दि. ९.७.२००९.

२) नगर विकास विभाग परिपत्रक क्र. संकिर्ण-१०/२००२२प्र.क्र.८६/नवि-२७, दि. १४.५.२००३.

३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. पीएलए-१००३/प्र.क्र.१२११/ऊर्जा-४, दि. २४.६.०३.

---

राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका यांच्याकडील पाणी पुरवठा व दिवाबत्तीपोटी चालू विज देयके व वाढत जाणारी थकबाकी, वसुलीकरीता शासनस्तरावर या विभागाद्वारे पाठपुरावा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने नगरविकास विभागाद्वारे उपरोक्त संदर्भाय (क्र.१) परिपत्रक जारी करण्यात आले आहे. सदरहू परिपत्रक संदर्भ क्र. २ व ३ अधिकृत करुन, शासन स्तरावरील संबंधितांनी करावयाच्या कार्यवाहीसाठीचे आदेश निर्गमित केले आहेत.

येथे असे हि नमुद करावेसे वाटते की, उपरोक्त शासन परिपत्रक क्र. २ व ३ वर आधारित शासन निर्णयानुसार, महावितरण मधील सर्व संबंधीतांना सर्व साधरण परिपत्रक क्र. ३७८ दि. ५.७.२००३ अन्वये थकबाकी व चालु विज देयके वसुली करीता करावयाच्या कार्यवाहीबाबत सुचित केले आहे.

शासनाद्वारे चालू विज देयके व थकबाकी वसुलीसाठीचे स्पष्ट आदेश असताना सुध्दा, तसेच याबाबत करावयाच्या कार्यवाहीसाठी या विभागाद्वारे सुचित करुनही वाढत जाणारी थकबाकी लक्षात घेता, क्षेत्रिय कार्यालयाने योग्य ती खबरदारी घेतली नाही असे खेदाने नमुद करावेसे वाटते.

सबब, सर्व संबंधीतांना याद्वारे सुचित करण्यात येते की, चालू विज देयके व थकबाकी वसुली करीता शासन परिपत्रक संदर्भ क्र. २ व ३ आधिनराहून खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) सर्व संबंधित आपल्या क्षेत्रिय विभागातील महानगरपालिका / नगरपालिका यांचे आयुक्त / मुख्य अधिकारी यांना माहे ऑक्टोबर २००९ चे चालू देयक जे माहे नोव्हेंबर २००९ मध्ये देय होईल, या महिन्यापासुन पुढील चालू देयके नियमितपणे भरणा करावीत असे सुचित करावे.

२) असे सूचित करुन सुध्दा ज्या महानगरपालिका / नगरपालिका चालू विज देयके भरणार नाहीत त्यांचा वीज पुरवठा मंडळाच्या नियमाप्रमाणे खंडीत करण्यात यावा.

३) सर्व क्षेत्रिय अधिकारी जिल्हाधिका-यांच्या सहमतीने थकबाकी वसुली करीता द्यावयाचे हप्ते ठरवून घेतील.

४) असे हप्ते ठरवून दिल्यानंतरही ज्या महानगरपालिका / नगरपालिका थकबाकीचे हप्ते भरत नसतील तर संबंधित अधिकारी जिल्हाधिका-यांना सुचित करुन अशा महानगरपालिका व नगरपालिका यांना शासनाद्वारे देण्यात येणारे अनुदान महावितरण कंपनीस सरळ अदा करणेविषयी जिल्हाधिका-यांना विनंती करतील.

सर्व संबंधित क्षेत्रिय अधिका-यांना याद्वारे पुन:श्च सुचित करण्यात येते की, चालू देयके व थकबाकी वसुलीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे अन्यथा या पुढील थकबाकीस ते जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

संचालक (संचलन)

प्रति-

१) प्रादेशिक कार्यकारी संचालक (१) कल्याण/(२) पुणे/(३) नागपूर.

---- उपरोक्त शासन आदेशानुसार आपल्या अधिपत्याखालील कार्यालये, चालू विज देयके व थकबाकी वसुलीसाठी खबरदारी घेतील या करीता आपण जातीने लक्ष घालावे.

२. सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालये.

३. सर्व अधिक्षक अभियंता, संवसु मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित.

४. सर्व कार्यकारी अभियंता, संवसु विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित.

५. सर्व उपकार्यकारी अभियंते / सहाय्यक अभियंते, संवसु उपविभागीय कार्यालये.

प्रत सविनय सादर -

१) व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, मुंबई.

२) संचालक (वित्त), महावितरण, मुंबई.

D/D/10600
18-7-09.

महानगरपालिका / नगरपालिका यांनी
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची
(महावितरण) वीजेची देयकें व
थकबाकी भरण्यासंबंधी------

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन परिपत्रक, क्र.संकीर्ण २००९/७९१/प्र.क्र.१२५/नवि-२०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : ९ जुलै, २००९.

वाचा:- (१) या विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-१०/२००२/प्र.क्र.८६/ नवि-२७, दिनांक १४.५.२००३
(२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.पीएलए-१००३/प्र.क्र.१२११/ऊर्जा-४, दिनांक २४ जून, २००३.

परिपत्रक

महानगरपालिका / नगरपालिका पाणी पुरवठा किंवा दिवाबत्ती यासाठी विजेचा वापर करतात त्यांनी वीज बिलांची रक्कम दरमहा नियमित भरलीच पाहिजे आणि जर विजेची बिले थकित असतील तर त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाकडून जिल्हाधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने परतफेडीचे हप्ते ठरवून घ्यावेत व ठरविलेल्या हप्त्याप्रमाणे रकमेचा भरणा करावा, असे निदेश संदर्भाधिन शासन परिपत्रकान्वये देण्यात आले होते. या परिपत्रकात असेही नमुद करण्यात आले होते की, खर्चात काटकसर करुन थकबाकीची रक्कम वाढू देवू नये तसेच उत्पन्नातील ठराविक रक्कम सांविधिक देयके देण्यासाठी राखून ठेवावीत व मंडळास अदा करावी. अन्यथा आयुक्त / मुख्याधिकारी यांना व्यक्तीशः जवाबदार धरण्यात येवून कर्तव्यच्युती केल्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. सोबत या परिपत्रकाची तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांच्या दिनांक २४ जून, २००३ च्या निर्णयाच्या प्रती जोडल्या आहेत.

०२. वरील परिपत्रकान्वये निदेश देवूनही महानगरपालिका / नगरपालिकांच्या पाणी पुरवठा व दिवाबत्तीसाठी वीज पुरवठ्याच्या देयकाच्या थकबाकीत वाढ होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सबब, संदर्भाधिन शासन परिपत्रकातील निदेशानुसार वीज पुरवठ्याची थकित देयकाची रक्कम त्वरीत अदा करण्याची कार्यवाही महानगरपालिका / नगरपालिका यांनी करावी अन्यथा थकबाकीच्या

ROTA/H 1131 (500-7-09)1 (क्र. म.पृ.

एकनेबाबत आयुक्त / मुख्याधिकारी यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल व ते कर्तव्यच्युती केल्याबद्दल शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सहपत्र : २.

(म.दि. आडिवरेकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) आयुक्त, सर्व महानगरपालिका,
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विज वितरण मंडळ लि., वांद्रे (पूर्व), मुंबई,
४) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई,
५) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई,
६) सर्व जिल्हाधिकारी,
७) मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका /नगरपंचायती,
८) सह सचिव, (नवि-४/१४/१६) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) नगर विकास विभागातील सर्व कार्यासने,
१०) निवडनस्ती, नवि-२०.

-----

महानगरपालिका/ नगरपालिका यांनी महाराष्ट्र राज्य
विद्युत मंडळाची वीजेची देयके व थकबाकी
भरण्यासंबंधी.......

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक, क्रमांक : संकीर्ण-१०/२००२/प्र.क्र.८५/नवि-२१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- १४ मे, २००३

परिपत्रक

राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका यांची रस्त्यावरील दिवे/पाणी पुरवठा यासाठी लागणा-या वीजेची थकबाकी अंदाजे रुपये ५४२ कोटी आहे. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयामध्ये नागपूर खंडपीठ येथे दाखल केलेल्या जनहित याचिकेमध्ये सन्माननीय उच्च न्यायालयाने "ज्या महानगरपालिका, नगरपालिका किंवा सार्वजनिक संस्था वीज देयके नियमित भरणार नाहीत. अशांच्या विद्युत जोडण्या तोडण्यात याव्यात" असे निदेश दिले आहेत. वास्तविक ज्या नागरी संस्था पाणीपुरवठा किंवा दिवाबत्तीसाठी वीजेचा वापर करतात त्यांनी वीज बिलांची रक्कम दरमहा नियमित भरलीच पाहिजे. जर एखादया महानगरपालिकेत/ नगरपालिकेत वीजेची थकित बीले असतील तर त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाकडून जिल्हाधिका-यांच्या मध्यस्थीने परतफेडीचे हप्ते ठरवून घ्यावेत व ठरविलेल्या हप्त्याप्रमाणे रक्कमेचा भरणा करावा. ज्या महानगरपालिका/नगरपालिका ठरविल्यानुसार हप्त्याची परतफेड करीत नसतील तर जिल्हाधिका-यांनी त्या महानगरपालिका/नगरपालिकांना देण्यात येणा-या शासकीय अनुदानातून हप्त्यांच्या रकमा परस्पर महाराष्ट्र वीज मंडळाकडे भरणा कराव्यात.

याशिवाय महानगरपालिका/नगरपालिका यांनी दिवाबत्ती व सुविधा पुरविण्यास अधिक खर्च करतात त्यांच्या या खर्चात काटकसर करावी व थकबाकीची रक्कम वाढणार नाही याची नोंद घ्यावी. प्रसंगवशात येथे असे नमूद करण्यात येते की, महानगरपालिका/नगरपालिका यांच्या उत्पन्नातील ठराविक रक्कम मासिक देयके देण्यासाठी राखून ठेवावी व मंडळास अदा करावी. अन्यथा, आयुक्त/मुख्याधिकारी यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येऊन कर्तव्यच्युती केल्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सुभाष लाला )
सचिव

प्रत,
आयुक्त, सर्व महानगरपालिका,
संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा
नगर विकास विभाग (नवि-१४, २४, २७)

--------

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सार्वजनिक पाणी पुरवठा
आणि पथदिपांची म.रा.वि.मंडळाची वीज बील
थकबाकी वसुलीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्र.वीएलए-२००३/प्र.क्र.१२११/ऊर्जा-४**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२,**
**दिनांक:-२४ जून,२००३.**

**वाचा:-नगर विकास विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक:संकिर्ण-१०/२००२/प्र.क्र.८६/नवि-२७, दि:१४मे,२००३.**

**प्रस्तावना:-**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाकडून तसेच शासन अंगीकृत विविध उपक्रमांकडून सार्वजनिक दिवाबत्ती,पाणी पुरवठा व इतर बाबींबाबत जनतेशी निगडीत असलेल्या सेवा पुरविल्या जातात.त्यांचेकडून देण्यात येणा-या सेवांपोटी निर्माण झालेली वीज मंडळाची विद्युत देयके विहीत मुदतीत मंडळास अदा न केल्यामुळे त्यांचेकडे मोठ्या प्रमाणावर वीजबिलाची थकबाकी वाढत चाललेली आहे.मोठ्या प्रमाणावरील मंडळाच्या वीज बीलाच्या थकबाकीमुळे मंडळास रोकड सुलभतेच्या प्रश्नाला सामोरे जावे लागत असून परिणामतः राज्यातील विद्युत पुरवठ्याची स्थिती चांगली राखण्यास मंडळ असमर्थ ठरत आहे. मंडळाची स्थानिक संस्थाकडील थकबाकी कमी करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

१. राज्यातील महानगरपालिका आणि नगरपालिका सार्वजनिक संस्था यांचेकडील पाणी पुरवठा आणि पथदिपांची नियमित वीज देयके व थकबाकी भरण्यासंदर्भाने नगर विकास विभागाने निर्गमित केलेल्या उक्त दि. १४मे,२००३ च्या परिपत्रकांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने (मजीप्रा ) ब-याचशा योजना स्थानिक संस्थाकडे विशेषत्वाने ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करुनही पुर्वीच्या थकबाकीच्या कारणास्तव त्या योजनांची वीज जोडणी त्या त्या संस्थाच्या नावे झालेली नाही. त्यामुळे अशा योजनांचे वीज बिल मजीप्रा किंवा संबंधित संस्था यापैकी कोणीच भरीत नाहीत. अशा सर्व प्रकरणी म.रा.वि.मंडळाने त्या योजनांच्या वीज जोडण्या त्वरित संबंधित स्थानिक संस्थाच्या नावे कराव्यात. मजीप्राच्या नांवे दर्शविलेल्या थकबाकीसंदर्भात मजीप्राने योजना हस्तांतरणापूर्वीची व हस्तांतरणानंतरची थकबाकीची रक्कम म.रा.वि.मंडळाच्या सहाय्याने वेगवेगळी करण्याची कार्यवाही करावी. ही कार्यवाही संबंधित जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे मदतीने मजीप्राचे अधिक्षक अभियंता यांनी

ऑगस्ट २००३ अखेरपर्यंत पूर्ण करावी. अशाच प्रकारची कार्यवाही मजिप्रा संबंधित अधिक्षक अभियंता यांनी नागरी पाणी पुरवठा योजनांसंदर्भात, जेथे लागू असेल तेथे करावी. याप्रमाणे वीज बिल थकबाकीची विभागणी न झाल्यास ती रक्कम भरण्याची जबाबदारी मजिप्राची राहील.

२.१ याप्रमाणे निश्चित केलेल्या थकबाकीचे सुलभ हप्ते निश्चित करण्यासाठी संबंधित स्थानिक संस्था किंवा मजीप्रा म.रा.वि.मंडळाकडे संपर्क साधतील. थकबाकीच्या हप्त्याची रक्कम म.रा.वि.मंडळाकडे अदा करण्यासंदर्भाने कुचराई झाली तर म.रा.वि. मंडळ अशा थकबाकीबाबत दर ३ महिन्यांनी संबंधित जिल्हापरिषद तसेच ग्राम विकास विभाग आणि पाणी पुरवठा विभाग यांच्याकडे संदर्भ करेल, जेणेकरुन त्या स्थानिक संस्थेला द्यावयाच्या अनुदानातून वीज बिल थकबाकीच्या रकमेची कपात करता येईल. तद्नंतरही वीजबिलाच्या रकमेचा भरणा विद्युत मंडळाकडे झाला नाही तर मंडळाकडून विद्युत पुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात यावी. जिल्हापरिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतींची चालू वीज देयके भरण्याचे क्षमता तपासून त्यांना यासंदर्भाने आवश्यक ते दर वाढविणे, खर्चात कपात करणे, इ. उपाय योजण्याबाबत निदेश द्यावेत, जेणेकरुन वीज बिलाची देयके अदा करण्यास त्या सक्षम होतील.

२.२ एकदा वीज बिलांच्या थकबाकीचा मेळ घालून त्यासंदर्भातील हप्ते निश्चित झाल्यावर महानगरपालिका/नगरपालिका/ ग्रामपंचायतीसारख्या स्थानिक संस्था त्यांची चालू वीज देयके तसेच थकबाकीचे हप्ते नियमितपणे भरण्याची काळजी घेतील. अन्यथा त्यांचा वीज पुरवठा म.रा.वि.मंडळाव्दारे खंडित केला जाईल जिल्हाधिकारी / जिल्हा पोलिस अधिक्षक / विभागीय आयुक्त /जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कायदा आणि सुव्यवस्थेचे कारण देऊन विद्युत पुरवठा खंडित न करण्याची कार्यवाही करण्याबाबत मंडळावर दबाव आणू नये. अशा प्रकारचे कोणतेही आदेश मंडळावर बंधनकारक असणार नाहीत. मंडळाने असे आदेश शासनाच्या निदर्शनास आणावे. अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब करावयाची झाल्यास विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी यांनी ऊर्जा विभागाचे आदेश घ्यावेत.

३. पथदिपांचे वीज बिल भरण्यासाठी ग्रामपंचायतीना १०० टक्के अनुदान देण्यात येते. सद्यस्थितीत ग्राम विकास विभागाकडून जिल्हापरिषदांमार्फत संबंधित ग्रामपंचायतीना हे अनुदान देण्यात येते. त्यामुळे ग्रामपंचायतीकडील पथदिपांची वीज बिल थकबाकी मंडळाकडे अदा झाली नाही तर अशा थकबाकीचा वर्षाच्या शेवटी मंडळाकडून शासनास येणे असलेल्या रकमेशी मेळ घालून पुस्तकी समायोजनाने सदरची रक्कम मंडळास अदा करण्यात यावी. समायोजनानंतरही संपूर्ण थकबाकीची वसुली होत नसेल तर संबंधितांचा वीज पुरवठा म.रा.वि.मंडळाव्दारे खंडित करण्यात येईल.

[illegible] शासनाच्या विविध कार्यालयांद्वारे मंडळास देय असणारी वीज देयकाची रक्कम संबंधित विभागाकडून थेट मंडळाकडे अदा करण्यासंदर्भाने कार्यवाही करण्याचा प्रस्ताव या विभागाच्या विचाराधीन होता. तथापि अशा पध्दतीने क्षेत्रीय कार्यालयांची वीज बिले अदा करण्यात आली तर त्यांच्याकडून वीज वापर काटकसरीने न होता तो अनिर्बंध होऊन वीज बिलाची रक्कम मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता विचारात घेऊन मंडळाची वीज देयके नियमितपणे भरण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखांवर सोपविण्यात येत आहे. कार्यालय प्रमुखांनी उपलब्ध अनुदान प्राधान्याने वीज बिल भागविण्यासाठी वापरावे. यापूर्वीची म्हणजेच दि. ३१.३.२००३ पर्यंतची सुमारे ४२.१२ कोटी इतकी शासकीय कार्यालयांची वीज बिलाची थकबाकी,थकबाकीच्या रकमेचा मेळ शासनाचा संबंधित विभाग व म.रा.वि.मंडळ यांनी घातल्यावर एकदाच सदर रक्कम मंडळास पुस्तकी समायोजनाने अदा करण्यांत येईल.

४.१ रुग्णालय आणि अग्नीशमन केंद्र या अत्यावश्यक सेवा वगळून इतरांचा वीज पुरवठा थकबाकीस्तव खंडित करण्याची मुभा विहीत कार्यपध्दतीचे पालन केल्यावर मंडळास राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वी.वी.शर्मा )
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:-

सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/जिल्हा पोलिस अधिक्षक
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
आयुक्त,सर्व महानगरपालिका
मुख्याधिकारी,सर्व नगरपरिषदा
अध्यक्ष,म.रा.वि.मंडळ,प्रकाशगड,वांद्रे(पूर्व),मुंबई ४०००५१
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,४था मजला,एक्सप्रेस टावर्स,नरीमन पॉइंट,मुंबई.
सहसचिव (पापु -३३)पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई ४०००३२.३
उपसचिव,(पंरा-४)ग्राम विकास विभाग,मंत्रालय,मुंबई ४०००३२.
उपसचिव,(नवि-२७)नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई ४०००३२.

--------

एच-557(ए)(800-6-03)2.